# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 04/08/2021 (बुधवार)
(दुपार)

---

### फसवणुक

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि मी अंतरावररल वार्ड क्र 14 लोहकरे ले आउट कळमेश्वर येथे दिनांक 02/08/2021 चे 11.00 ते दिनांक 03/08/2021 चे 09.47 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश शांताराम गोतमारे, वय 65 वर्ष, रा. लोहकरे ले आउट वार्ड क्र 14, कळमेश्वर यांना अज्ञात आरोपीने त्याचे मोबाईल वरून फोन करून स्वतः एस.बी.आय बॅक मॅनेजर आहे असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून अज्ञात आरोपीने फिर्यादीस ''आपले अकाउंट व एटीएम ब्लॉक झाले आहे, त्याकरीता तुम्हाला के.वाय.सी क्लीअर करावी लागेल, मी तुम्हाला जे कागदपत्रे मागतो ते तुम्ही मला दया'' असे सांगितले. यानंतर आरोपीने फिर्यादीस ए.टी.एम चा पीन कोड व ओ.टी.पी नंबर विचारला यावरून फिर्यादीने त्यास नंबर सांगताच दि. 02/08/2021 रोजी 8 ट्रान्जेशन मध्ये एकुण 3,10,100/–रू. डेबीट झाले असुन 2 ट्रान्जेशन मध्ये 25,000+10,000= 35,000/–रूपयाचे क्रेडीट झाले. त्याचप्रमाणे दि. 03/08/2021 रोजी 2 ट्रान्जेशन प्रत्येकी 25,000/–रूपयाचे एकुण 50,000/– रूपयाचे डेबिट असुन 2 ट्रान्जेशन प्रत्येकी 25,000/– रूपयाचे एकुण 50,000/–रूपयाचे क्रेडीट सुद्धा आहे. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादीच्या खात्यातुन एकुण 2,75,100/–रू. ची फसवणुक करून वळते केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 419, 420 भादंवि. सहकलम 66(क)(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री असिफराजा शेख हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि. मी अंतरावरील शितलवाडी रामटेक येथे दिनांक 07/06/2021 चे 10.00 ते दिनांक 31/07/2021 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी वय 32 वर्ष हिने लग्नाकरीता मागील 06 महीण्यापुर्वी एबीपी मॅट्रीमोनी वर नोंद केली. सदर मॅट्रीमोनी वर फिर्यादी यांनी त्यांचा व्हॉट्सॲप क्रमांक प्रोफाईल वरती ठेवला होता. आरोपी क्र. 1. मरगन ऑक्सफोर्ड, रा. युनायटेड किंगडम याने सदर प्रोफाईल मधील फिर्यादीचा नमुद व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक प्राप्त करून फिर्यादीला आरोपी क्र. 1 याने त्याचे व्हॉट्सअप वरून जवळीक संपादन करून फिर्यादी चे अधुन मधुन व्हॉट्सअप चेटींग एसएमएस व कॉलींग चालु असल्याचे आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. यानंतर आरोपी क्र. 1 ने फिर्यादीस लग्नाचे आमीष दाखवुन दि. 17/07/2021 रोजी फिर्यादीस व्हॉट्सअप कॉलींगद्वारे कळविले की, एक पार्सल पाठविले आहे त्यानंतर आरोपी क्र. 2. सितालक्ष्मी अय्यर, रा. दिल्ली व 3. अज्ञात व्यक्ती यांनी कॉल करून सदर पार्सल करीता 20,000/–रू. फी अदा करावी लागेल असे सांगितले. फिर्यादीचा विश्वास बसल्याने फिर्यादीने दि. 18/07/2021 रोजी 20,000/–रू. आरोपी क्र. 02 हिने दिलेल्या युनियन बॅक खात्याच्या गुगल पे वरती पाठविले. परंतु आरोपी क्र. 02 यांनी फिर्यादीस 1,00,000/– डॉलर परत जातील अशी भिती दाखवुन वारंवार कॉल केल्याने फिर्यादीने दि. 20/07/2021 रोजी चेक व्दारे 93,800/–रू. आर. टी.जी. एस.केले. परत आरोपी क्र. 02 हिने दि. 21/07/2021 रोजी फोनद्वारे फिर्यादीस 1,00,000/– डॉलर भारतीय चलनात बदलविने साठी सदर रक्कम भरावीच लागेल असे सांगितल्याने फिर्यादी हिने दि. 26/07/2021 रोजी 2,85,890/–रू. आरटीजीएस द्वारे पाठविले होते.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(क)66(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री प्रमोद मकेश्वर मो. नं. 9049965014 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील घोगली ते घोराड रोडवर येथे दिनांक 25/06/2021 चे 22:30 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे— धर्मरत्न चव्हाण, रा. वार्ड 1, कळमेश्वर हा सायकलने नाईस पेपर मिल घोगली येथुन घरी परत जात असतांना पांढऱ्या रंगाचा कारचा चालक अज्ञात आरोपीने त्याचे सायकला समोरून धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होवुन उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अक्षय धर्मरत्न चव्हाण, वय 25 वर्ष, रा. वार्ड 1, कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी सुरेश बुंदे मो. न. 9850881987 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर